<u>**Nashik Gavkari**</u>

# सनड्रॉपचे गोल्ड लाईट तेल




नाशिक (वार्ताहर) :- अमेरिकेतील कॉन ॲग्रो फूडस्‌ची संलग्न कंपनी असलेल्या ॲग्रो टेक फूडस् लिमिटेडने सनड्रॉप गोल्ड लाईट हा सनड्रॉप खाद्य तेलाचा नवा प्रकार बाजारात सादर केल्याची घोषणा केली आहे. सनड्रॉप तेल मालिकेतील गोल्ड लाईट हा नवा प्रकार चवदार रिफाईन्ड वनस्पती तेलापासून बनवलेला आहे. आरोग्य, चव, दर्जा आणि ग्राहकाला पैशांचा पूर्ण मोबदला या सनड्रॉपच्या चार कसोट्यांवर पूर्णपणे उतरतो. गोल्ड लाईटमध्ये मक्यापासून काढलेले तेल (४० टक्के) आणि सूर्यफुलापासून काढलेले तेल (६० टक्के) यांचे मिश्रण आहे. इतर खाद्यतेलांच्या मानाने गोल्ड लाईट जास्त आरोग्यकारक आहे. या तेलातले संपृक्त स्निग्धांशाचे प्रमाण अत्यल्प असल्यामुळे खाणाऱ्याच्या रक्तातील कोलेस्टेरॉलचे प्रमाण कमी राखण्यास मदत होते. या तेलापासून शरीराची स्निग्धाम्लाची रोजची गरज भागते आणि मज्जासंस्थेच्या कामाला तसेच पेशींच्या वाढीला मदत होते. या नव्या उत्पादनामुळे सनड्रॉपने उच्च दर्जाच्या तरीही परवडणाऱ्या खाद्यतेलांची नवी परंपरा सुरू केली आहे. मक्याचे तेल आणि सूर्यफुलाचे तेल यांच्या या अजोड मिश्रणामुळे 'सुदृढ लोकांसाठी सुदृढ तेल' सादर करणाऱ्या सनड्रॉप मालिकेत भर पडली आहे, असे ॲग्रो टेकचे अध्यक्ष आणि मुख्य कार्यकारी अधिकारी सचिन गोपाल यांनी नमूद केले. देशभरातील सर्व दुकानांमध्ये अवघ्या ७५ रुपये किमतीला उपलब्ध असल्यामुळे ''पिपके कम हेल्थ जादा'' सनड्रॉप गोल्ड लाईट सर्वांना परवडेल, असा दावा करण्यात आला आहे.